पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १७
**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/०४/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२२/०४/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. जाधव साधना रामदास – सभापती**
**२.** मा. सौ.पानसरे अमिना महंमद
**३.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**४.** मा. आल्हाट मंदा उत्तम
**५.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**६.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.पवार – कार्यालय अधिक्षक (सभाशाखा), मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविणेबाबत – मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) २१ जून २०१५ रोजी जागतिक योग दिन साजरा करणेबाबत – मा.शुभांगी बो-हाडे, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मा.महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांसाठी आभ्यास दौरा आयोजित करणेबाबत – मा.मंदा आल्हाट, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

---------

दिनांक ०८/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १६ )** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : २१ विषय क्रमांक : १

दिनांक : २२/०४/२०१५

सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे

संदर्भ :- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला व मुलांसाठी / मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यात " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " ही योजना राबविण्यात येते. सदरची योजना गेल्या २ आर्थिक वर्षापासून मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्या प्रकारे राबविली आहे व विशेष करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्तीपातळीवरील प्रशिक्षण घेण्याचा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला भरपूर अनुभव आहे. याचा विचार करता मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांना चालू वर्षाचे म्हणजे दि.३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधीत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम वस्तीपातळीवर राबविणेस मान्यता देणेत यावी. तसेच शैक्षणिक अर्हतेच्या कोर्सेससाठी महिलांकडून गोळा करणेत येत असलेल्या कागदपत्रांच्या संदर्भात काही अडचणी येतात. उदा. कोर्सेसमध्ये भाग घेत असलेल्या एखाद्या महिलेला १० वी पास चा पुरावा द्यायचा असेल तर ती तीचे १० वी चे मार्कशीट किंवा एल.सी. / टी.सी. असे देते, दिलेल्या १० वी पासच्या मार्कशीटवर किंवा एल.सी. / टी.सी.वर तीचे माहेरचे नाव असते व सद्या लग्न होऊन ती सासरी आली असल्याने तिच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून असलेल्या कागदपत्रांवर तीचे सासरचे नाव असते. ही दोन्ही नावे वेगळी असतात म्हणून तीला दोन्हीही कागदपत्रांचा संबंध जोडण्यासाठी लग्नपत्रिका, मॅरेज सर्टिफिकेट, पॅनकार्ड, किंवा प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. अशा प्रकरणात सद्याची समाजातील वस्तुस्थिती पाहता त्या महिलेकडे लग्नपत्रिका नसते, सर्वांकडेच मॅरेज सर्टिफिकेट ही नसते व सर्वांकडेच पॅनकार्ड ही नसते आणि प्रतिज्ञापत्र करायला पैसे खर्च होतात. म्हणून ब-याचशा महिलांना इच्छा असुनही शैक्षणिक अर्हततेचे कोर्सेस करता येत नाहीत. गेल्या दोन वर्षात मा. पदाधिका-यांनी ही बाब मा.स्थायी समिती, मा.महिला व बालकल्याण समिती व मा.संबंधीत अधिकारी यांच्या लक्षात आणुन दिली आहे. म्हणून शैक्षणिक अर्हततेच्या पुराव्याची अट कुठल्याही कोर्सेसला न लावता, सर्व कार्सेसला साक्षर अशी अट लावून मान्यता देण्यात यावी. म्हणजे कोर्स करायची इच्छा असलेली कुठलीही साक्षर महिला प्रशिक्षणापासून वंचीत राहणार नाही. सदरचे प्रशिक्षण हे प्रशासकीय स्तरावच्या मान्य अभ्यासक्रमानुसार व सदर प्रस्तावात 5-प्रपत्र – अ मध्ये नमुद केलेनुसार कालावधी ( दिवस/तास ) प्रशिक्षण शुल्कानुसार मनपाच्या अटी व शर्तीनुसार पात्र होणा-या महिला / मुलींना मे.अखिल भारतीय स्थानिक

स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत थेट पध्दतीने देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षासह एकूण ४० उपलेखा शिर्षांचा समावेश आहे. तरी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ३९ उपलेखा- -शिर्षांतर्गत केलेल्या तरतूदींमधून आवश्यकतेनुसार रकमा वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे व त्यानुसार सदर योजना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत राबविणेकामी योजनेच्या अंमल बजावणीकामी प्रशासकीय व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२ विषय क्रमांक : २

दिनांक : २२/०४/२०१५

सुचक : मा.शुभांगी बो-हाडे अनुमोदक : मा.मंदा आल्हाट

संदर्भ :- मा.शुभांगी बो-हाडे, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव –

२१ जून २०१५ रोजी जागतिक योग दिन साजरा करणेत यावा व यामध्ये खालील प्रमाणे कार्यक्रमांचा समावेश असावा. १) पिंपरी चिंचवड शहरातील महिलांसाठी योग कार्यशाळा, २) योगासन प्रात्यक्षिके, ३) योगामधील विविध विषयांवरील तज्ञांची व्याख्याने, ४) जागतिक योग स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या महिलांचा सत्कार. वरील प्रमाणे जागतिक योग दिन साजरा करणेस व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक असणारा खर्च सभागृहाचे भाडे, साऊंड सिस्टिम, प्रोजेक्टर, व्याख्यात्यांचे मानधन, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, बॅनर व स्टॅन्डी पुष्पगुच्छ, मान्यवरांचा चहा नाष्टा, प्रवास खर्च इ.साठी र.रु.५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी २१ जून २०१५ हा जागतिक योग दिन नागरवस्ती विभागाच्यावतीने साजरा करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५०,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २३ विषय क्रमांक : ३

दिनांक : २२/०४/२०१५

सुचक : मा.मंदा आल्हाट अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ :- मा.मंदा आल्हाट, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे इतर राज्यांमध्ये महिलांसाठी ज्या कल्याणकारी योजना, उपक्रम राबविण्यात

येतात त्याची पहाणी करण्याच्या हेतूने मा.महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांसाठी सिक्किम दार्जिलिंग, केरळ, काश्मिर यापैकी एका ठिकाणी मे २०१५ मध्ये अभ्यासदौरा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३४० /२०१५
दिनांक : ३०/०४/२०१५

**कार्यालय अधिक्षक**
**सभाशाखा**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## प्रपत्र – अ – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम

मा. महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.२१ दिनांक २२/०४/२०१५ चे लगत

| अ.क्र. | विषयाचे नाव | शैक्षणिक पात्रता | कार्यक्रम कालावधी ( दररोज २ तास ) | |
|---|---|---|---|---|
| | | | कालावधी | तास |
| १ | स्पोकन इंग्लिश | ७ वी पास | ३० दिवस | ६० तास |
| २ | ब्युटीकल्चर व हेअर डिझायनिंग | साक्षर | ७५ दिवस | १५० तास |
| ३ | दुग्धजन्य पदार्थ तयार करणे | साक्षर | ३० दिवस | ६० तास |
| ४ | अडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती (केमिकल फ्लॉवर, सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) | साक्षर | ४५ दिवस | ९० तास |
| | ज्वेलरी तयार करणे | | १५ दिवस | ३० तास |
| | फर टॉईज | | १० दिवस | २० तास |
| | **एकूण** | | **७० दिवस** | **१४० तास** |
| ५ | विविध प्रकारच्या अगरबत्ती, धुप, सुगंधी उटणे, फेस पॅक, सुगंधी तेल, शॅम्पु, अत्तरे, हर्बल मेहंदी तयार करणे. | साक्षर | २५ दिवस | ५० तास |
| ६ | प्ले ग्रुप टिचर्स प्रशिक्षण | १० वी पास | ३० दिवस | ६० तास |
| ७ | घरगुती वापरातील पदार्थ तयार करणे. (विविध मसाले, शेवई, लोणची, पापड इ.) | साक्षर | १५ दिवस | ३० तास |
| | बेकरी उत्पादने | | १० दिवस | २० तास |
| | **एकूण** | | **२५ दिवस** | **५० तास** |
| ८ | सेल्सगर्ल्स प्रशिक्षण | ७ वी पास | ३० दिवस | ६० तास |
| ९ | बाल संगोपन प्रशिक्षण | साक्षर | ३० दिवस | ६० तास |
| १० | विमा सल्लागार | १० वी पास | ३० दिवस | ६० तास |
| ११ | पेपर कन्व्हर्जन | ५ वी पास | ६० दिवस | १२० तास |
| १२ | रुग्ण सेविका प्रशिक्षण | ७ वी पास | ३० दिवस | ६० तास |
| १३ | केटरींग व्यवस्थापन | साक्षर | ३० दिवस | ६० तास |
| १४ | रेडीमेड गारमेंटस व टेलरींग | साक्षर | ९० दिवस | १८० तास |